सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

# सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६

# महाराष्ट्र विवादीत थकबाकी तडजोड अधिनियम, २०१६

(दिनांक २५ मे २०१७ पर्यंत सुधारित)

## Maharashtra Act No. XVI of 2016

# MAHARASHTRA SETTLEMENT OF ARREARS IN DISPUTES ACT, 2016

(*As modified upto the 25 May 2017*)

*

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांनी भारतात मुद्रित केले आणि संचालक, शासकीय मुद्रण लेखनसामग्री व प्रकाशने, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांनी प्रकाशित केले.

**२०१७**

[**किंमत :** रुपये २४.०० ]

# सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६

# महाराष्ट्र विवादीत थकबाकी तडजोड अधिनियम, २०१६

## अनुक्रमणिका

**उद्देशिका.**


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ | २ |
| २. | व्याख्या | २ |
| ३. | पदनिर्देशित प्राधिकारी | ३ |
| ४. | तडजोडीसाठी शर्ती | ४ |
| ५. | अपील मागे घेणे | ४ |
| ६. | आवश्यक रकमेची व माफीच्या रकमेची निश्चिती | ४ |
| ७. | अर्ज निकालात काढणे | ६ |
| ८. | अपील | ७ |
| ९. | अधिनियमान्वये कोणताही परतावा न मिळणे | ७ |
| १०. | तडजोडीचा आदेश रद्द करणे | ७ |
| ११. | पुनर्विलोकन | ८ |
| १२. | आयुक्तांचे अधिनियमाखालील अधिकार | ८ |
| १३. | नियम करण्याचे अधिकार | ८ |

**(सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६.)**

# महाराष्ट्र विवादीत थकबाकी तडजोड अधिनियम, २०१६

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **“महाराष्ट्र शासन राजपत्रात”**
दिनांक २६ एप्रिल २०१६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४* द्वारे सुधारित (११/१/२०१७)**

**विक्रीकर विभागाकडून अंमलबजावणी केल्या जाणाऱ्या विभिन्न अधिनियमांखालील विवादातील थकबाकीची तडजोड करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

१९५८ चा मुंबई ६६. १९५९ चा मुंबई ५१. १९८५ चा मुंबई १८. १९८९ चा महा. ३६. १९५६ चा ७४. १९६२ चा महा. ९. १९७५ चा महा. १६. १९८७ चा महा. ४२. १९८७ चा महा. ४१. २००३ चा महा. ४. २००५ चा महा. ९.

**ज्याअर्थी,** मुंबई मोटार स्पिरीट विक्री कराधान अधिनियम, १९५८ (सध्या निरसित), मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५९ (सध्या निरसित), महाराष्ट्र कोणताही माल कोणत्याही प्रयोजनासाठी वापरण्याच्या हक्काच्या हस्तांतरणावरील विक्रीकर अधिनियम, १९८५ (सध्या निरसित),महाराष्ट्र कार्य-कंत्राटांच्या अंमलबाजवणीत अंतर्भूत असलेल्या मालातील मालमत्तेच्या हस्तांतरणावरील विक्रीकर (पुनरधिनियमित) अधिनियम, १९८९, (सध्या निरसित), केंद्रीय विक्रीकर अधिनियम, १९५६, महाराष्ट्र ऊस खरेदी कर अधिनियम, १९६२, महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५, महाराष्ट्र स्थानिक क्षेत्रांमध्ये मोटार वाहने आणण्यावरील कर अधिनियम, १९८७, महाराष्ट्र ऐषआराम सेवांवरील कर अधिनियम, १९८७, महाराष्ट्र स्थानिक क्षेत्रात मालाच्या प्रवेशावरील कर अधिनियम, २००२, आणि महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ यांखालील विवादातील थकबाकीची तडजोड करण्यासाठी तरतूद करणे इष्ट आहे, **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सदुसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

---

* सन २०१६ चे महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २३, २४ व २७ हे, सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४, कलम ६ अन्वये निरसित करण्यात आले.

(शा.म.मु.) एच ४०३०–२ (४०१४–८–२०१७)

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. **१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र विवादीत थकबाकी तडजोड अधिनियम, २०१६, असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

व्याख्या. **२.** (१) या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(१) " अपील प्राधिकारी " याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम ८ मध्ये विनिर्दिष्ट केलेले प्राधिकारी, असा आहे ;

(२) " विवादीत थकबाकी " यामध्ये, ३१ मार्च २०१२ रोजी किंवा त्यापूर्वी संपणाऱ्या कोणत्याही कालावधीसंबंधीच्या ज्या कोणत्याही वैधानिक आदेशाविरुद्ध [१][संबद्ध अधिनियमाखालील अपील प्राधिकाऱ्याकडे किंवा न्यायाधिकरणाकडे किंवा न्यायालयाकडे [१][३० नोव्हेंबर २०१६] च्या आत अपील दाखल केले असेल अशा] कोणत्याही वैधानिक आदेशासंबंधातील,—

(एक) संबद्ध अधिनियमाखालील कर–मग तो कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो ;

(दोन) संबद्ध अधिनियमान्वये अर्जदाराकडून देय असलेले व्याज ;

(तीन) संबद्ध अधिनियमान्वये अर्जदारावर लादण्यात आलेली शास्ती ;

यांचा समावेश होतो ;

(३) " अर्जदार " याचा अर्थ, संबद्ध अधिनियमान्वये कर भरण्यास जबाबदार असलेली व्यक्ती, असा आहे आणि त्यामध्ये, या अधिनियमाखालील शर्तींचे पालन करून त्याद्वारे तडजोडीचा लाभ घेण्याची इच्छा असलेल्या कोणत्याही व्यक्तीचा समावेश आहे ;

(४) " तडजोड आदेश " याचा अर्थ, संबद्ध अधिनियमाखालील थकबाकी संबंधी तडजोड करण्यासाठी या अधिनियमाखाली दिलेला आदेश, असा आहे ;

(५) " आयुक्त " याचा अर्थ, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ याच्या कलम १० च्या पोट-कलम (१) अन्वये विक्रीकर आयुक्त म्हणून नियुक्त केलेला अधिकारी, असा आहे ; २००५ चा महा. ९.

(६) " पदनिर्देशित प्राधिकारी " याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम (२) अन्वये नियुक्त केलेला प्राधिकारी, असा आहे ;

(७) " संबद्ध अधिनियम " याचा अर्थ,—

(क) केंद्रीय विक्रीकर अधिनियम, १९५६ ; १९५६ चा ७४.

(ख) मुंबई मोटार स्पिरीट विक्री कराधान अधिनियम, १९५८ ; १९५८ चा मुंबई ६६.

(ग) मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५९ ; १९५९ चा मुंबई ५१.

---

[१] सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४, कलम २ (एक) व (दोन) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

१९६२ चा महा. ९. (घ) महाराष्ट्र ऊस खरेदी कर अधिनियम, १९६२ ;

१९७५ चा महा. १६. (ङ) महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजिविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ ;

१९८५ चा महा. १८. (च) महाराष्ट्र कोणताही माल कोणत्याही प्रयोजनासाठी वापरण्याच्या हक्काच्या हस्तांतरणावरील विक्रीकर अधिनियम, १९८५ ;

१९८७ चा महा. ४२. (छ) महाराष्ट्र स्थानिक क्षेत्रामध्ये मोटार वाहने आणण्यावरील कर अधिनियम, १९८७ ;

१९८७ चा महा. ४१. (ज) महाराष्ट्र ऐषआराम सेवांवरील कर अधिनियम, १९८७ ;

१९८९ चा महा. ३६. (झ) महाराष्ट्र कार्य-कंत्राटांच्या अंमलबजावणीत अंतर्भूत असलेल्या मालातील मालमत्तेच्या हस्तांतरणावरील विक्रीकर (पुनरधिनियमित) अधिनियम, १९८९ ;

२००३ चा महा. ४. (ञ) महाराष्ट्र स्थानिक क्षेत्रात मालाच्या प्रवेशावरील कर अधिनियम, २००२ ;

२००५ चा महा. ९. (ट) महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२,

असा आहे आणि त्यामध्ये, त्याखाली केलेले नियम किंवा काढलेल्या अधिसूचना यांचा समावेश आहे ;

(८) " आवश्यक रक्कम " याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम ६ अन्वये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे भरणे आवश्यक असलेली रक्कम ;

(९) " वैधानिक आदेश " याचा अर्थ, अर्जदाराकडून देय असलेला कर, व्याज किंवा शास्ती वसूल करण्यासाठी संबद्ध अधिनियमान्वये काढलेला कोणताही आदेश, असा आहे ;

(२) या अधिनियमात वापरलेले, परंतु यात व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना संबद्ध अधिनियमांन्वये जे अर्थ नेमून दिलेले असतील तेच अर्थ असतील.

**३.** (१) या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, राज्य शासन, याद्वारे, विक्रीकर आयुक्ताची या अधिनियमाखालील आयुक्त म्हणून नियुक्ती करीत आहे. पदनिर्देशित प्राधिकारी.

२००५ चा महा. ९. (२) महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ याचे कलम १० चे पोट-कलम (२) यात नमूद करण्यात आलेले अधिकारी हे, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, पदनिर्देशित प्राधिकारी असतील. उक्त अधिकाऱ्यांची दुय्यमता ही, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर नियम, २००५ याच्या नियम ५ अनुसार असेल.

(३) आयुक्त, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या पदनिर्देशित प्राधिकाऱ्यांकडे असे अधिकार प्रत्यायोजित करील आणि असे प्राधिकारी वेळोवेळी अधिसूचित

करण्यात येईल अशा त्यांच्या अधिकार क्षेत्रात किंवा क्षेत्रांमध्ये अधिकारांचा वापर करतील.

तडजोडीसाठी शर्ती.

**४.** [1][(१) ज्या अर्जदाराची विवादीत थकबाकीच्या रकमेची तडजोड करण्याची इच्छा असेल असा अर्जदार, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रीतीने ३० नोव्हेंबर २०१६ पर्यंत पदनिर्देशित प्राधिकाऱ्याकडे अर्ज सादर करील :

परंतु, या अधिनियमाच्या कलम ६ च्या पोट-कलम (१) किंवा (२) अनुसार, निर्धारित केलेली आवश्यक ती रक्कम भरल्याचा पुरावा, याबाबत विहित केलेल्या दिनांकास किंवा त्यापूर्वी सादर करण्यात येईल.].

(२) प्रत्येक संबद्ध अधिनियमाखालील प्रत्येक वैधानिक आदेशाकरिता अर्जदाराद्वारे स्वतंत्र अर्ज करण्यात येईल.

(३) अर्जदार, कलम ५ अनुसार, अपील मागे घेतल्याचा पुरावा सादर करील.

(४) अर्जदार, ज्या वैधानिक आदेशासाठी माफीची मागणी करीत आहे त्या आदेशाच्या बाबतीत संबद्ध अधिनियमाअन्वये अविवादीत थकबाकीची संपूर्ण रक्कम चुकती करील.

अपील मागे घेणे.

**५.** विवादीत थकबाकीच्या बाबतीत, या अधिनियमाअन्वये ज्या अर्जदाराची माफीचा लाभ घेण्याची इच्छा असेल तो, [2][३० नोव्हेंबर २०१६] रोजी किंवा त्यापूर्वी अपील प्राधिकारी किंवा न्यायाधिकरण यांच्यासमोर किंवा, यथास्थिति, न्यायालयासमोर प्रलंबित असलेली अपिले मागे घेईल :

परंतु, अपिलात उपस्थित केलेल्या काही बाबींशी निगडीत थकबाकीची तडजोड करण्यासाठी हा पर्याय स्वीकारण्याची अर्जदाराची इच्छा असेल तर, तो अशा बाबींविरुद्ध अपील मागे घेईल.

आवश्यक रकमेची व माफीच्या रकमेची निश्चिती.

**६.** (१) संबद्ध अधिनियमाअन्वये ३१ मार्च २००५ रोजी किंवा त्यापूर्वी समाप्त होणाऱ्या कोणत्याही निर्धारण कालावधीच्या संबंधातील विवादीत थकबाकी असेल तर, माफीची रक्कम ही खालील तक्त्याच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या भरणा रकमेव्यतिरिक्तची रक्कम असेल :—

**तक्ता—१**

| थकबाकीचा प्रकार (१) | माफीच्या शर्ती (२) | माफीची मर्यादा (३) |
|---|---|---|
| या अधिनियमाच्या कलम ५ च्या संबंधातील विवादीत थकबाकी. | (एक) अर्जदार, या कलमाच्या [3][पोट-कलम (४) नुसार प्रदान केलेली रक्कम] प्रदान करील. | (क) कलम ५ अन्वये मागे घेण्यात आलेल्या बाबींच्या संदर्भातील विवादीत थकबाकीवरील संपूर्ण व्याज व शास्तीची रक्कम. |
| | (दोन) काही बाबींकरिता अपील मागे घेण्यात आले असल्यास अर्जदार, ज्या | (ख) स्तंभ (२) अनुसार भरणा केलेल्या रकमेवर देय निर्धारणोत्तर शास्ती व व्याज |

[1] सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४, कलम ३ अन्वये पोट-कलम (१) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[2] सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४, कलम ४ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ५(१) (एक) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| | बाबींसाठी अपील मागे घेण्यात आले असेल अशा बाबींच्या संबंधातील संपूर्ण कराची रक्कम भरेल व या कलमाच्या [१][पोट-कलम (४) नुसार प्रदान केलेली रक्कम] मागे घेण्यात आलेल्या अपिलात अंतर्भूत असलेल्या बाबींवरील कराच्या प्रमाणात देण्यात येतील. | यांची संपूर्ण रक्कम तसेच कलम ५ अंतर्गत मागे घेण्यात आलेल्या बाबींच्या संदर्भात पोट-कलम (४) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या कराच्या रकमेवरील देय निर्धारणोत्तर शास्ती व व्याजाची संपूर्ण रक्कम. |

(२) संबद्ध अधिनियमाअन्वये १ एप्रिल २००५ रोजी सुरु होणाऱ्या व त्यानंतरच्या व ३१ मार्च २०१२ पर्यंत समाप्त होणाऱ्या कोणत्याही निर्धारण कालावधीशी संबंधित विवादीत थकबाकी असेल तर, माफीची रक्कम ही, खालील तक्त्याच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या भरणा रकमेव्यतिरिक्तची रक्कम असेल.

**तक्ता—२**

| थकबाकीचा प्रकार (१) | माफीच्या शर्ती (२) | माफीची मर्यादा (३) |
|---|---|---|
| या अधिनियमाच्या कलम ५ च्या संबंधातील विवादीत थकबाकी. | (एक) अर्जदार, या कलमाच्या [२][पोट-कलम (४) नुसार प्रदान केलेली रक्कम] विवादीत थकबाकीतून वजा करून संपूर्ण कराची रक्कम व अदत्त व्याजाच्या पंचवीस टक्के इतकी रक्कम प्रदान करील.<br>(दोन) काही बाबींकरिता अपील मागे घेण्यात | (क) कलम ५ अन्वये मागे घेतलेल्या बाबींच्या संबंधातील विवादीत रकमेपैकी व्याजाची उर्वरित रक्कम आणि शास्तीची संपूर्ण रक्कम.<br>(ख) स्तंभ (२) अनुसार भरणा केलेल्या रकमेवर देय निर्धारणोत्तर शास्ती व व्याज यांची रक्कम तसेच कलम ५ अंतर्गत मागे घेण्यात आलेल्या |

[१] सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियन क्रमांक ४, कलम ५(१) (दोन) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ५(२)(एक) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| | आलो असेल तर, अर्जदार ज्या बाबींसाठी अपील मागे घेण्यात आलो असेल अशा बाबींसंबंधातील विवादीत थकबाकीवरील संपूर्ण कराची रक्कम व अदत्त व्याजाच्या पंचवीस टक्के इतकी रक्कम भरील व या कलमाच्या [१][पोट-कलम (४) नुसार प्रदान केलेली जमा रक्कम] मागे घेण्यात आलेल्या अपिलात अंतर्भूत असलेल्या कराच्या प्रमाणात देण्यात येतील. | बाबींच्या संदर्भात पोट-कलम (४) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या कराच्या रकमेवरील देय निर्धारणोत्तर शास्ती व व्याजाची संपूर्ण रक्कम. |

(३) या कलमाच्या पोट-कलमे (१) व (२) अन्वये आवश्यक रकमेचे प्रदान, संबंधित अधिनियमाअन्वये विहित केलेल्या चलनात किंवा यथास्थिति, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर नियम, २००५ अन्वये विहित केलेल्या एमटीआर-६ नमुन्यात करण्यात येईल.

(४) संबद्ध अधिनियमाखालील कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही संबंद्ध अधिनियमाअंतर्गत [२][वैधानिक आदेशानंतर मात्र अपील दाखल करण्यापूर्वी केलेले कोणत्याही रकमेचे प्रदान किंवा अपील प्राधिकारी, न्यायाधिकरण किंवा न्यायालय यांच्यासमोर अपिलात केलेले रकमेचे अंशतः प्रदान या अधिनियमान्वये आवश्यक रकमेचे प्रदान म्हणून समजण्यात येईल आणि ही रक्कम प्रथमतः करासाठी समायोजित करण्यात येईल आणि त्यानंतर व्याजाची रक्कम म्हणून समायोजित करण्यात येईल आणि समायोजित न झालेली उर्वरित रक्कम नंतर शास्तीपोटी समायोजित करण्यात येईल.

(५) या कलमानुसार माफीची मर्यादा, अर्जदाराने या कलमाच्या पोट-कलमे (१) व (२) अन्वये केलेल्या प्रदानाच्या प्रमाणात देण्यात येईल.

अर्ज निकालात काढणे.

**७.** (१) पदनिर्देशित प्राधिकारी, अपूर्ण किंवा चुकीच्या अर्जासाठी त्रुटीची नोटीस देऊ शकेल. अर्जदार, नोटीस प्राप्त झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत चुका दुरुस्त करील व रक्कम देय असल्यास त्याचा भरणा करेल आणि त्यानुसार पदनिर्देशित प्राधिकाऱ्याला सादर करील. अर्जदाराने असे करण्यास कसूर केल्यास, पदनिर्देशित प्राधिकारी, म्हणणे ऐकून घेण्याची संधी दिल्यानंतर, लेखी नोंद घेऊन विवादीत थकबाकीच्या तडजोडीचा अर्ज आदेशाद्वारे नाकारू शकेल.

[१] सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४, कलम ५(२)(दोन) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ५(३) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) पदनिर्देशित प्राधिकारी, प्रत्येक अर्जाकरिता अपील मागे घेतल्याचा तसेच आवश्यक रक्कम प्रदान केल्याच्या पुराव्यासह अर्ज प्राप्त झाल्यावर तसेच माफीसाठीच्या सर्व अटींची पूर्तता केल्याची खात्री करून विवादीत थकबाकीच्या रकमेचा तडजोडीचा आदेश पारीत करेल.

(३) संबंद्ध अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, अर्जदारास ज्यासाठी तडजोडीचा आदेश देण्यात आला असेल अशा विवादीत थकबाकीच्या रकमेचा भरणा करण्याच्या संबद्ध अधिनियमातील त्याच्या दायित्वापासून मुक्त करण्यात येईल.

(४) पदनिर्देशित प्राधिकाऱ्यास या कलमाच्या पोट-कलम (२) अन्वये पारीत आदेश, अर्जदारास प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत त्याला स्वतःहून किंवा अर्जदाराच्या अर्जावरून, अभिलेखात सकृतदर्शनी दिसून येणारी कोणतीही चूक दुरुस्त करता येईलः

परंतु, अर्जदाराला, आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय, त्याच्यावर प्रतिकूल परिणाम होईल अशी कोणतीही दुरुस्ती करण्यात येणार नाही.

**८.** (१) कलम ७ च्या पोट-कलम (१) अन्वये देण्यात आलेल्या आदेशाविरुद्धचे अपील हे,— अपील.

(क) जर तो आदेश उपायुक्तापेक्षा दुय्यम असणाऱ्या प्राधिकाऱ्याने दिला असेल तर, उपायुक्ताकडे दाखल होईल,

(ख) जर तो आदेश उपायुक्ताने किंवा सह आयुक्ताने दिलेला असेल तर, अपर आयुक्ताकडे दाखल होईल.

(२) कलम ७ च्या पोट-कलम (१) अन्वये पारीत केलेल्या आदेशाविरुद्ध आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून अर्जदाराला साठ दिवसांत अपील दाखल करता येईल.

(३) कलम ७ च्या पोट-कलम (२) अन्वये देण्यात आलेल्या तडजोडीच्या आदेशाविरुद्ध अपील दाखल करता येणार नाही.

**९.** कोणत्याही परिस्थितीत, अर्जदार या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी भरणा करण्यात आलेल्या विवादातील थकबाकीच्या रकमेबाबतच्या कोणत्याही रकमेचा आणि या अधिनियमान्वये भरणा केलेल्या रकमेचा परतावा मिळण्यासाठी हक्कदार असणार नाही. अधिनियमान्वये कोणताही परतावा न मिळणे.

**१०.** कलम ७ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पदनिर्देशित अधिकाऱ्यास, अर्जदाराने कोणतीही महत्त्वाची माहिती दडवून ठेऊन किंवा कोणतीही चुकीची किंवा खोटी माहिती सादर करून तडजोडीचा लाभ मिळवला असल्याचे दिसून आल्यास किंवा संबद्ध अधिनियमान्वये तपास व जप्ती यासंबंधातील कोणत्याही कार्यवाहीतील महत्त्वाचे तथ्य दडवून ठेवले असल्याचे आढळून येईल, तेव्हा पदनिर्देशित प्राधिकाऱ्यास, अर्जदाराला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, लेखी कारणे नमूद करून अधिनियमाच्या कलम ७ च्या पोट-कलम (२) अन्वये काढण्यात आलेला तडजोडीचा आदेश रद्द करता येईल. तडजोडीचा आदेश रद्द करणे.

पुनर्विलोकन.

**११.** पदनिर्देशित अधिकाऱ्याकडून आदेश काढण्यात आल्यानंतर, आयुक्तास, आदेश बजावल्याच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या आत, कोणत्याही वेळी स्वतःहून, अशा आदेशाचा अभिलेख मागविता येईल आणि अशा आदेशामध्ये चूक आढळल्यास, जेथवर महसुलाच्या हितास तो बाधक ठरेल तेथवर, विक्रेत्यावर नोटीस बजावता येईल आणि आवश्यकता भासेल तेथे आपल्या यथा निर्णयशक्तीनुसार आदेश देता येईल.

आयुक्तांचे अधिनियमाखालील अधिकार.

**१२.** (१) आयुक्तास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी त्याला दुय्यम असणाऱ्या प्राधिकाऱ्यांना व अधिकाऱ्यांना त्याला योग्य वाटतील असे, अनुदेश व निदेश वेळोवेळी देता येतील.

(२) आयुक्तास, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी नमुने विहित करता येतील.

नियम करण्याचे अधिकार.

**१३.** (१) राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) या कलमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा अधिक अधिवेशनात मिळून एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल. आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहे सहमत होतील किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहे सहमत होतील आणि असा निर्णय **राजपत्रात** अधिसूचित करतील तर, अशी अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आल्याच्या दिनांकापासून, तो नियम अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल, किंवा, यथास्थिति, तो अंमलात येणार नाही ; तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन केल्यामुळे त्या नियमान्वये पूर्वी करण्यात आलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाधा येणार नाही.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

# महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**
  शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय
  महाराष्ट्र राज्य,
  नेताजी सुभाष मार्ग, मुंबई ४०० ००४.
  दूरध्वनी : ०२२-२३६३ २६ ९३, २३६३ ०६ ९५
  २३६३ ११ ४८, २३६३ ४० ४९

- **व्यवस्थापक**
  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. जवळ,
  पुणे ४११ ००१.
  दूरध्वनी : ०२०-२६१२ ५८०८, २६१२ ४७ ५९

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार
  सिव्हिल लाईन्स,
  नागपूर ४४० ००१.
  दूरध्वनी : ०७१२-२५६२ ६१५

- **सहा. संचालक**
  शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार
  शहागंज, गांधी चौकाजवळ,
  औरंगाबाद ४३१ ००१.
  दूरध्वनी : ०२४०-२३३१ ४६८, २३३१ ५२५

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार
  ताराबाई पार्क,
  कोल्हापूर ४१६ ००३.
  दूरध्वनी : ०२३१-२६५० ३९५, २६५० ४०२

**आणि महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते**